संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# मूल्यांचीच होळी होण्याची भीती

**यंदाचा** होळीचा सण राजकीय धुळवडीमुळे सर्वात जास्त गाजणार आहे. भारतीय संस्कृतीमध्ये होळी सणाला फार मोठी परंपरा आहे. भारतीय कालगणनेप्रमाणे फाल्गुन हा शेवटचा महिना असतो. या महिन्यातला होळी हा शेवटचा सणही मानला जातो. दुष्ट प्रवृत्तींचा नाश व्हावा वर्षभरामध्ये केलेल्या चुकांचे परिमार्जन करून नव्या वर्षाच्या स्वागताला सिध्द होण्याची होळी किंवा धुळवड ही पूर्वतयारीच म्हणता येते. गावात किंवा परिसरातल्या लोकांनी एकत्र येऊन हा सण साजरा करण्याची परंपरा समाजातल्या एकात्मतेला पाठबळ देणारे आणि मतभेद किंवा एकमेकांमधील वैमनस्य दूर करण्याचे आवाहन करणारे होळी हे निमित्त ठरते. त्यामागचा उद्देश निश्चितच उदात्त आणि व्यापक स्वरुपाचा आहे. एकूणच भारतीय संस्कृतीमध्ये अग्नीला विशेष स्थान दिले गेले आणि त्या अग्नीला साक्षी ठेवून दुष्ट प्रवृत्ती किंवा अनिष्ट प्रथांचे निर्दालन करण्याची संधी यानिमित्ताने दिली जाते. यामागचा कर्मकांडाचा भाग सोडला तर प्रत्येकाला आपल्या आयुष्यामध्ये सौजन्य निर्माण करता यावे आणि समाजजीवन अधिक सुखरुप असावे अशीच त्यामागची भूमिका दिसून येते. प्रत्यक्षात या उद्दीष्टाचे भान ठेवले गेले पाहिजे. दुर्दैवाने आजच्या व्यापारी युगामध्ये पैसा आणि संपत्ती कमावण्याची प्रचंड स्पर्धा दिसून येते. या हव्यासापोटी व्यक्ती किंवा समाज आपापसातले मतभेद पूर्णपणे संपवताना दिसत नाही. मग ते कोणतेही क्षेत्र असो. एका उदात्त हेतूने हजारो वर्षांपासून सुरू असलेल्या या परंपरेचे इतक्या प्रामाणिकपणे पालन होताना दिसत नाही. आजचे समाजजीवन पूर्वीपेक्षा अधिक राजकारणग्रस्त होऊ लागले आहे. आणि या क्षेत्रात कोणत्याच नीतीमूल्यांची चाड ठेवली जात नसल्याने एकमेकांमधला अविश्वास हीच या क्षेत्राची ओळख झालेली आहे. सत्ता, संपत्ती, पैसा एवढ्याच कारणांसाठी राजकारणाचा वापर होतो. देशाचा विकास किंवा समाजहित या गोष्टींना गौण ठरवले जाते. आता तर लोकसभा निवडणुकीचाच धूर उडाला आहे. त्या राजकीय प्रचारामध्ये आरोप प्रत्यारोपांची सुरू असलेली ही धुळवड एकूणच समाजजीवनाला मारक ठरते. राजकारण या क्षेत्राची तर प्रतिष्ठा कधीच लयाला गेली आहे.

### टीचभर गोव्यात मंत्रीपदांची खिरापत

या सगळ्या धुळवडीचे किंवा राजकारणातल्या सत्तालोलुपतेचे सवंग प्रदर्शन काही ना काही निमित्ताने घडत असतेच. परंतु त्याचे ताजे उदाहरण म्हणून गोव्यातल्या सत्ताप्रकरणाचे देता येते. मनोहर पर्रिकर यांच्या अंत्यसंस्काराचीही वाट न पाहाता दोन्ही पक्षांनी सत्तेसाठी केलेले दावे किंवा इतर पक्षांचे आमदार फोडून मंत्रीपदाची वाटली गेलेली खिरापत सत्तालोलुपतेचा एक किळसवाणा प्रकार ठरतो. इन मिन चाळीस आमदार असलेल्या या विधानसभेत सर्वाधिक म्हणजे पंधरा आमदार आहेत. पर्रिकरांच्या निधनामुळे आता भाजपाची संख्या बारावर आली आहे. आपण अल्पमतात आहोत याची जराशीही जाणीव न ठेवता अपक्ष आणि इतरांच्या मदतीने ही संख्या अठरापर्यंत नेण्याचा खटाटोप भाजपश्रेष्ठींनी केला. आज भाजपाकडे अगदी वीस आमदारांचे जरी संख्याबळ आहे असे मानले तरीसुध्दा हा सगळा सत्तेसाठी खेळला गेलेला सट्टाबाजारच म्हणावा लागतो. कारण टीचभर गोव्यासाठी तब्बल बारा जणांचे मंत्रिमंडळ त्यात पुन्हा दोन उपमुख्यमंत्री आणि एक मुख्यमंत्री असा सगळा सत्ता ओरबाडण्याचा खेळ केला गेला. जिथे दोनदोनशे तीनतीनशे आमदार असतात अशा राज्यांच्या विधानसभांमध्येसुध्दा दोन उपमुख्यमंत्री नसतात. परंतु गोव्याने पर्रिकरांच्या पश्चात हा विक्रमच करून दाखवला आहे. सत्ता टिकवण्याकरीता भारतीय जनता पार्टीसारखा पक्ष कोणत्या थराला जाऊ शकतो याचे ते विदारक उदाहरण ठरते. पर्रिकरांच्या पश्चात पक्षाची पडझड होण्याची शक्यता होती. कदाचित म्हणूनच ते इतके आजारी असूनही त्यांना मुख्यमंत्रीपदी राहाण्याचा आग्रह धरला गेला. त्यांच्या निधनानंतर पक्षातल्या काही आमदारांचा असंतोष शमवण्याकरिता आणि घटक पक्षांचा पाठिंबा मिळवण्याकरिता चौदा- पंधरा मंत्रीपदांची खिरापत वाटली गेली आहे. सत्ताधारी पक्षाच्या एकूण आमदारांपैकी दहा टक्केच मंत्रीपदे असावीत. असा एक संकेत भारतीय जनता पार्टीनेच नक्की केला होता. पण गोव्याने तोही मोडीत काढला आहे. हा प्रकार कदाचित गोव्यातल्यादोन्ही लोकसभा जागा आपल्याला जिंकता याव्यात आणि सत्ताआपल्या ताब्यात असावी या हेतूने हा डाव खेळला गेलेला दिसतो.

### म्हणून समाजव्यवस्था टिकवून

लोकसभा निवडणुकीचाच हंगाम असल्यामुळे सर्वच पक्षांमध्ये ही धुळवड पाहायला मिळते. अन्य पक्षांमधले लोक आपल्याकडे खेचून आणण्याचा महाराष्ट्र भाजपाचा प्रयोग किंवा सत्तेसाठीच थेट विरोधी पक्षनेतेपदाचाही राजीनामा देण्याच्या मानसिकतेचे प्रदर्शन हादेखील त्याच स्वार्थी सत्तालोलुपतेचा नमुना म्हणावा लागतो. होळीच्या निमित्ताने राजकारणातले हे सगळे प्रकार घडत असल्याने त्याची त्याच पध्दतीने दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. म्हणूनच त्याला राजकीय धुळवडीचे हे विकृत रुप म्हणावे लागते. यापूर्वी घाऊक पध्दतीने पक्षांतरे होत असत.हरियाणामध्ये भजनलालनावाचे मुख्यमंत्री होते त्यांनी आपल्या अख्ख्या मंत्रिमंडळासकट पक्षांतर करण्याचा विक्रम केला होता. त्यानंतरच या आयाराम गयाराम प्रकाराला लगाम घालण्याकरीता पक्षांतर बंदी विधेयक आणले गेले. परंतु त्याचाही फारसा परिणाम झालेला दिसत नाही. समाजजीवनावर सर्वाधिक प्रभाव असलेले राजकीय क्षेत्र जर अशा विकृतींनी झपाटलेले असेल तर सामान्य माणसाच्या जीवनावर त्याचा परिणाम होत असे याचा अंदाज केलेला बरा. जिथे समाजजीवन निर्मत्सर असावे. किंवा सामाजिक सहकार्य वाढावे. अशी सर्वांनाच अपेक्षा असताना राजकारणातला हा स्वार्थीपणा घातक ठरतो. लोकशाहीसारख्या व्यवस्थेचा अशा पध्दतीने केला जाणारा वापर मूल्यांचीच होळी करणारा आणि स्वार्थी सत्तासंपत्तीची धुळवड करणाराच म्हणावा लागतो. त्यातल्या त्यात समाज समंजस असल्यामुळे या धुळवडीला सामान्य माणूस इतकी भीक घालीत नाही. म्हणून समाजव्यवस्था काही प्रमाणात टिकून राहिली आहे.